म.स.कौ वि. क्र.७८/२०२३
निता वि. विलास
निशाणी क्रमांक १० खाली

**अर्जदारातर्फे सा.क्र. १ चा उलटतपास गैरअर्जदार तर्फे श्री. डी.व्ही.शेजवळ वकील यांचे तर्फे शपथेवर सुरु**

माझे मुळ गाव धानोरा, ता. नांदुरा, जि. बुलडाणा हे आहे. लग्नानंतर मी पारखेड ता.खामगाव येथे गैरअर्जदाराकडे रहायला गेले होते. त्याठिकाणी मी १५-२० दिवस राहिले होते. त्यानंतर मी व माझे पती गैरअर्जदार क्र. १ व त्याची आई गैरअर्जदार क्र. २ शोभा असे मिळून दिल्ली येथे राहण्याकरता गेलो होतो. दिल्ली वरुन ऑक्टोबर २०२१ मध्ये मी माझ्या माहेर आले होते. ज्यावेळी मी आले होते त्यावेळी मी गर्भवती होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझी आईने गैरअर्जदार क्र. १ ला फोन करुन असे म्हटले होते की, ‘तु तुझ्या आईला व भावाला सोडल्यास मी माझ्या मुलीला तुझ्याकडे नांदवायला पाठवले'.

प्रश्न- तुम्ही नांदायला न आल्यामुळे गैरअर्जदार क्र. १ व त्याचे नातेवाईक तुम्हाला घ्यायला दि.०१/१२/२०२१ रोजी तुमच्या माहेरी आले होते वतुम्हाला नांदायला घेऊन गेले होते ?

उत्तर - हे खोटे आहे.

माझे बाळंतपण पारखेड येथे झाले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी गैरअर्जदार क्र. १ माझ्या सोबत होता.

प्रश्न- बाळंतपणानंतर तुम्ही तुमच्या माहेरी गेले होते ?

उत्तर - मला गैरअर्जदार घ्यायलाच न आल्यामुळे मी माझ्या माहेरी गेले होते.

हे म्हणणे खरे नाही की, एप्रिल २०२२ मध्ये गैरअर्जदार क्र. १ हा सुट्टी काढुन

दिल्लीवरुन मला भेटायला पारखेड येथे आला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी गैरअर्जदारास माझ्या मुलीला भेटु दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ दिल्लीला निघुन गेला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतःहुन माहेरी राहात आहे. हे म्हणणे खरे नाही की, कुठलेही कारण नसतांना मी स्वतःहुन गैरअर्जदार क्र.१ चा त्याग केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४/११/२०२१ रोजी गैरअर्जदार क्र. १ ने मला नांदायला यावे म्हणुन मला नोटीस पाठवली होती व ती घेण्यास मी नकार दिल्यामुळे ती परत आली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र. १ सोबत राहात असतांना त्याला म्हणायचे की, त्याने त्याच्या भाऊ व आईपासुन वेगळे राहिले नाहीतर मी त्यांच्यावर खोटी केस करेल व त्यांना जेलची हवा खायला लावेल अशी धमकी देत असे. गैरअर्जदाराने खामगाव येथील दिवाणी न्यायालय व.स्तर येथे हिंदु विवाह कायदयानुसार मी त्याच्याकडे नांदायला यावे म्हणुन हिंदु मॅरेज पिटीशन क्र. २३५/२०२३ दाखल केला आहे.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी आमच्या लग्नामध्ये नगदी दोन लाख रुपये व दागदागिने, कपडे व संसार उपयोगी वस्तु इ. दिल्याबाबत मी खोटे सांगत आहे.

प्रश्न- तुमचे लग्न पारखेड येथे तुमच्या मामाच्या घरासमोर साध्या पध्दतीने करण्यात आले होते ?

उत्तर – होय, परंतु चांगल्या पध्दतीने ते लग्न झाले होते.

प्रश्न- तुम्ही गैरअर्जदार क्र. १ ला ५०,०००/- रुपये वेतन मिळते याबाबत काही कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे का ?

उत्तर - होय मी गैरअर्जदार क्र. १ चे वेतनपत्रक दाखल केले आहे.

हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. २ ही वयोवृध्द आहे व तिच्या पालन पोषणाची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ वर आहे.

प्रश्न- गैरअर्जदार क्र. २ ही गैरअर्जदार क्र. ३ सोबत तुमच्या लग्नाआधीपासुन राहात होती ?

उत्तर – होय, आम्ही दिल्ली येथे क्वाटर नसल्यामुळे एकत्र राहात होतो.

माझे शिक्षण बी.एस्सी. ॲग्रीकल्चर पर्यंत झाले आहे.

प्रश्न- तुम्हाला शिवणकाम, केक बनविणे, ब्युटीपार्लर चालविण्याचे इ. चे आवड आहे ?

उत्तर - मला फक्त केक बनविण्याची आवड आहे.

हे म्हणणे खरे नाही की, मी शिवणकाम व ब्युटीपार्लर चालविण्याचे काम करते. हे म्हणणे खरे नाही की, त्यापासुन मला महिन्याकाठी २४ ते २५ हजार उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारांनी माझ्यावर कोणताही घरगुती कौटुंबिक हिंसाचार केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझे पती गैरअर्जदार क्र.१ तसेच गैरअर्जदार क्र. २ ते ५ हे कधीही एकत्र राहिलो नव्हतो.

मी सन २०२२ पासुन पैठण येथे राहात होते. माझे वडील नाशिक येथे कारागृहात नोकरीला होते व त्यांची बदली पैठण येथे झाल्यामुळे पैठण येथे राहात होतो. परंतु माझे वडील मे-२०२५ मध्ये सेवानिवृत्त झाल्यामुळे आम्ही पैठण गाव सोडले. सध्या मी खामगाव येथे माझ्या आईवडीलांकडे राहते.

प्रश्न- तुम्ही तुमच्या सरतपासाचे शपथपत्रामध्ये तुमचा खामगावचा पत्ता टाकला आहे का ?

उत्तर - होय टाकला आहे.

साक्षीदाराला आता तिचा सरतपास दाखविण्यात आला व तिने पैठणचा पत्ता टाकल्याचे सांगितले.

प्रश्न- तुम्ही खामगाव येथील पिटीशनमध्ये पैठण येथील पत्ता टाकलेला होता ?

उत्तर – होय, कारण त्यावेळी आम्ही पैठण येथे राहात होतो.

हे म्हणणे खरे नाही की, मी पैठण येथे प्रकरण दाखल करतेवेळी राहात नसतांना सुध्दा पैठण येथे राहात असल्याचे खोटे दर्शवुन गैरअर्जदारांना त्रास होण्याकरिता खोटा पत्ता दाखवुन पैठण न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदारावर त्याच्या आईची जबाबदारी असल्यामुळे व तसेच त्याला घराचे हफ्ते फेडायचे असल्यामुळे तो मला पोटगी देण्यास असमर्थ आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदारांविरुध्द खोटे प्रकरण दाखल केले आहे व आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by GANESH VASANTAPPA GANDHE
Date: 2026.01.28 17:37:40 +0530

**दिनांक** :२८.०१.२०२६

( जी.व्ही.गांधे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.०१, पैठण